कष्ट आणि प्रयत्ना शिवाय यश कधीच मिळत नाही.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | मंगळवार ४ मार्च २०२५ | अंक ८५ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु






# संतोष देशमुख हत्याप्रकरण : सीआयडीच्या चार्ज सीटवर मनोज जरांगे पाटलांना शंका

## नेमकं काय म्हणाले मनोज जरांगे पाटील?

चार्ज शीटवर शंका आहे, संतोष देशमुख यांच्या प्रकरणात सीआयडीनं चार्ज शीट दाखल केलं. मात्र उज्वल निकम यांची नियुक्ती झाल्यानंतर लगेचच दुस-या दिवशी चार्जशीट दाखल करण्यात आलं, यामध्ये बड्या नेत्याचं नाव आलं नाही, त्यामुळे शंका आहे, अशी प्रतिक्रिया यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी दिली आहे.



**संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणात सीआयडीकडून चार्ज शीट दाखल करण्यात आलं आहे, मात्र यावर आता मनोज जरांगे पाटील यांनी शंका उपस्थित केली आहे.**

बीड जिल्ह्यातल्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचं अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली होती. या घटनेमुळे राज्यभरात खळबळ उडाली, वातावरण चांगलंच तापलं. या प्रकरणात सुरुवातीपासूनच मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आक्रमक भूमिका घेतली. सरकारकडून या प्रकरणाचा तपास सीआयडीकडे सोपवण्यात आला होता, तसेच एसआयटीची देखील स्थापना करण्यात आली होती. अखेर सीआयडीकडून आरोप पत्र दाखल करण्यात आलं आहे. मात्र या आरोप पत्रावर प्रतिक्रिया देताना मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी शंका उपस्थित केली आहे. दरम्यान सध्या धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याबाबत जोरदार चर्चा सुरू आहे, यावर प्रतिक्रिया देताना पुन्हा एकदा मनोज जरांगे पाटील यांनी हल्लाबोल केला आहे. ते राहिले काय आणि नाही राहिले काय, काही फरक पडत नाही. मी अशांना मोजत नाही. पार कार्यक्रम लावून टाकला आहे. आता बाकीच्यांना खडी फोडायला जावं लागेल, मुंडे मंत्री असो किंवा नसो काही फरक पडत नाही. आपले नीट नाहीत, राजकीय अजेंडा चालवतात, असा हल्लाबोल यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे.

## मनोज जरांगे पाटील यांना बरं वाटत नाहीये

मनोज जरांगे पाटील यांना बरं वाटत नाहीये, त्यांची तब्येत बिघडली आहे. यावेळी बोलताना त्यांनी आपल्या तब्येतीबाबत देखील माहिती दिली. १५ दिवसांपासून अंग दुखत आहे, डोळ्यांना अंधा-या आल्या सारख झालं होतं. प्रवास खूप झाला म्हणून तब्येत बिघडली, असं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. संतोष देशमुख प्रकरणात नुकतचं सीआयडीकडून आरोप पत्र दाखल करण्यात आलं आहे, या आरोपपत्रातून अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत.

# पाटोदा डिजिटल मीडिया परिषदेच्या तालुकाध्यक्षपदी गोकुळ इंगोले

पाटोदा ( प्रतिनिधी ) मराठी पत्रकार परिषदेची सलग्न असलेल्या डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी पाटोदा तालुकाध्यक्षपदी गोकुळ इंगोले, कार्याध्यक्ष हरिदास शेलार तर सचिवपदी नितीन भोंडवे यांची निवड जाहीर केली आहे.

प्रिंट मीडिया सोबतच डिजिटल मीडियाला अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झाल्याने, या पुढील काळात प्रत्येक घटना आणि माहिती तात्काळ वाचक आणि प्रेक्षकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी आणि त्यासोबतच डिजिटल मीडियामध्ये काम करणाऱ्या प्रत्येक पत्रकारांच्या हितासाठी, मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांनी डिजिटल मीडिया परिषद स्थापन केली आहे. त्यांच्याच नेतृत्वाखाली आणि डिजिटल मीडिया परिषदेचे राज्याध्यक्ष अनिल वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी दिनांक ३ मार्च २०२५ रोजी डिजिटल मीडियाची बीड तालुका कार्यकारणी पुढील दोन वर्षासाठी जाहीर केली आहे. यात तालुकाध्यक्षपदी- गोकुळ इंगोले, कार्याध्यक्ष- हरिदास शेलार, उपाध्यक्ष- प्रदीप उबाळे, सचिव- नितीन भोंडवे तर संघटकपदी- बलभीम सावंत यांचा समावेश आहे.पबीड तालुक्यात यूट्यूब चैनल, इंस्टाग्राम, फेसबुक, ब्लॉग, व्हाट्सअप, ऑनलाइन दैनिक यासह वेगवेगळ्या डिजिटल मीडियाच्या माध्यमातून शेकडो पत्रकार काम करत आहेत. त्यांना संघटित करून योग्य दिशेने आणि सुसूत्र पद्धतीने डिजिटल मीडियाचे काम व्हावे. त्यासोबतच या क्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येक पत्रकाराला सुरक्षा देऊन त्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी डिजिटल मीडिया परिषद काम करत आहे. यासाठी पाटोदा तालुका कार्यकारणी जाहीर करण्यात आली असून पदाधिकाऱ्यांनी जास्तीत जास्त सदस्य नोंदणी करावी असे आवाहन डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी करून नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले



# देशमुख हत्या प्रकरणी एका आरोपीला जामीन मंजूर

केज । प्रतिनिधी मसाजोग गावाचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण पूर्ण महाराष्ट्रात परिचित आहे. त्यांचे अपहरण करते वेळी ज्याने लोकेशन दिले तो मस्साजोग येथीलच सिद्धार्थ सोनवणे याला काल कोर्टाने जामीन मंजूर केला आहे. संतोष देशमुख यांची टीप देणारा हा खरा गुन्हेगार होता असे बोलले जाते. गुन्हेगारीला सहकार्य करणाराही तितकाच आरोपी असतो. केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून हत्या केल्याच्या घटनेने बीड जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्र हादरला होता. परंतु संतोष देशमुख यांची टीप देणारा मस्साजोग येथीलच सिद्धार्थ सोनवणे नावाचा व्यक्ती होता. या व्यक्तीसाठी कोणी विनंती अर्ज दाखल केला होता हेही कळने तितकेच गरजेचे आहे. सिद्धार्थ सोनवणे याने संतोष देशमुख यांची टीप दिली आणि पुढे त्यांचे अपहरण करून निघृ'ण पद्धतीने हत्या करण्यात आली. सध्या सिद्धार्थ सोनवणे ह्याला नऊ नंबरचा आरोपी म्हणून घोषित करण्यात आले आहे. तो आरोपी असूनही त्याला कशाच्या आधारे जामीन मंजूर करण्यात आला आहे हे पाहणे गरजेचे असणार आहे. या संतोष देशमुख हत्या प्रकरणातील हा पहिला जामीन मंजूर करण्यात आला आहे असे मानावे लागेल.

# धरण उशाला कोरड घशाला म्हणण्याची वेळ

गेवराई । प्रतिनिधी गेवराई तालुक्यातील राक्षसभुवन हे पाच हजार लोकसंख्येचे गाव असून हे गाव शनि महाराजांमुळे राज्यात व पर राज्यात प्रसिद्ध आहे. या गावाच्या एका बाजूला गोदावरी नदी तर दुसऱ्या बाजूला उजवा कालवा वाहत असल्याने, पाण्याची मुबलक आवक आहे परंतु ग्रामपंचायतीच्या दुर्लक्षामुळे गावकऱ्यांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकती करावा लागत आहे. परंतु मधरण उशाला कोरड घशालाफ अशी वेळ राक्षसभुनकरांन म्हणण्याचे आले आहे. गेवराई



तालुक्यातील श्रीक्षेत्र राक्षसभुवन हे पाच हजार लोकसंख्येचे गाव असून या गावाला श्री शनि महाराज मंदिरामुळे राज्यात व पर राज्यात प्रसिद्धी असून या गावाच्या उजव्या बाजूला उजवा कालवा तर डाव्या बाजूला गोदावरी नदी वाहत असून येथील गावकऱ्यांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकती करावा लागत आहे वयोवृद्धापासून तर लहान मुलांना पाण्यासाठी दूर जावं लागत आहे तसेच या गावाच्या ग्रामपंचायतीच जुन्या सात विहिरी असून नवीन एक झाली आहे तरीपण गावकऱ्यांना ग्रामपंचायतीच्या दुर्लक्षामुळे पाण्यासाठी भटकती करावा लागत आहे. या ग्रामपंचायतीवर कसल्याही अधिकाऱ्याच्या धाक नसल्याने येथील ग्रामसेवक सुद्धा गावाकडे फिरकत नसल्याचे दिसून येत आहे गावकऱ्यांना पाणी सोडण्यात यावे नसता ग्रामपंचायतीवर हंडा मोर्चा काढण्यात येईल असा इशाराही गावकऱ्यांनी यावेळी दिला.

# गेवराईत रोड रोमिओंचा उच्छाद वाढला; मुलींची सुरक्षा वाऱ्यावर

गेवराई । प्रतिनिधी गेवराई तालुक्यातील ग्रामीण भागातील गावखेड्यातील मुली शिक्षणासाठी गेवराई शहरात येतात.परंतु या मुलींची सुरक्षा ऐरणीवर आलेली आहे. शाळा व महाविद्यालयाच्या सभोवताली रोडरोमिओंचा उच्छाद वाढल्याने मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. गेवराई तालुक्यातील ग्रामीण भागातील खेड्यापाड्यातून अनेक मुली गेवराईतील शाळा महाविद्यालयात शिक्षणासाठी येतात. शहरातील शाळा, महाविद्यालये सुटल्यानंतर रोडरोमिओंचा वावर शाळा, महाविद्यालयाच्या सभोवताली दिसून येतो. शाळा, महाविद्यालये परिसरात मोठ्या प्रमाणात रोडरोमिओंचा वावर वाढल्याने त्यांचा बंदोबस्त करणे आवश्यक आहे गेवराई पोलिस प्रशासनाकडून वेळोवेळी शाळा, महाविद्यालयात जाऊन मार्गदर्शन केले जाते. तसेच पोलिसांकडून पेट्रोलिंग सुरू असते. गेवराई शहरात तालुक्यातील काना-कोपऱ्यातून मुली शहरात शिकायला येत असतात. अशा वेळी बसस्थानक, शाळा महाविद्यालयात जाताना काही रोड रोमिओ दुचाकीवरून चक्करा मारत असतात. अशा वेळी पोलिसांनी उपयोजना करणं गरजेचं आहे. शाळेतील व महाविद्यालयीन विद्यार्थिनींना, तसेच महिलांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या रोडरोमीयोंची मजल मुलींचा विनयभंग करण्या पर्यंत जात असून केवळ भीती मुळे काही पालक त्यांची तक्रार करण्यास धजावत नाही. तर यांमुळे आपली शाळा, शिक्षण,नोकरी बंद होईल या भितीने मुलीही हा प्रकार पालकांना न सांगता निमूटपणे सहन करत असल्याने या रोडरोमियोंना चांगलेच रान मोकळे झाले आहे.



# किमान आता तरी नैतिकता दाखवून धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यावा : आ. संदीप क्षीरसागर



## वाल्मिक कराड राजकीय मदतीमुळे वाचल्याचा संदीप क्षीरसागरांचा दावा

बीड : संतोष देशमुख हत्याप्रकरणी वाल्मिक कराड हा मुख्य सूत्रधार असल्याचे समोर आले आहे. यामुळे वाल्मिक कराड याच्या अडचणीत वाढ झाली आहे. तसेच या प्रकरणाच्या तपासाला देखील वेगळे वळण लागले आहे. याप्रकरणी आता शरद पवार गटाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी मंत्री धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराड याच्यावर निशाणा साधला आहे. वाल्मिक कराड हा इतका मोठा माणूस नाही की त्याचा गुन्हा दाखल करायला २४ तास लावले, त्याला संरक्षण देण्याचा प्रयत्न केला. राजकीय मदतीमुळे तो वाचला होता. असा दावा क्षीरसागर यांनी केला. संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणामधील चार्जशीट मधून जे समोर आले तेच आम्ही आधीपासून बोलत होतो. संतोष देशमुख प्रकरणांमध्ये मुख्य मास्टर माईंड आणि सुत्रधार वाल्मिक कराडच आहे. असे संदीप क्षीरसागर यांनी सांगितले.धनंजय मुंडे म्हणतात की वाल्मिक कराड माझा निकटवर्तीय आहे. निकटवर्तीय आहे म्हणजे सगळे अधिकार त्याला दिले का? घटनाक्रम बघितला तर घुलेला कराडने फोन कधी केला, हे सगळं समोर आलं आहे. मुख्य आरोपी म्हणून कराड समोर आला असल्याने आता तरी नैतिकता दाखवून धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी देखील आ. संदीप क्षीरसागर यांनी केली. दरम्यान, आजपासून विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला सुरुवात झाली आहे. यामध्ये विरोधक धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याच्या मागणीवरून राज्य सरकारला घेरू शकतात. त्यामुळे सरकार मुंडेंचा राजीनामा घेणार की नाही? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार ४ मार्च २०२५
https://lokaarambh.com



## सं पा द की य

## बलात्काराची घटना सुन्न करणारी

पुणे येथील सदैव गर्दीने गजबजलेल्या स्वारगेट स्थानकात एसटी बसमध्ये झालेल्या बलात्काराची घटना सुन्न करणारी तर आहेच; पण त्याचबरोबर राज्याच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक राजधानीतील कायदा आणि सुव्यवस्था वेशीला टांगणारी आहे. विलक्षण वेगाने वाढत चाललेल्या पुण्यातील गुन्हेगारीला आळा घालण्यात आतापर्यंत अयशस्वी ठरलेल्या पोलिसांवरील उरलासुरला विश्वासही यामुळे संपुष्टात आला, तर नवल नाही. बसस्थानकासारख्या वर्दळीच्या सार्वजनिक ठिकाणी, पोलिस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर एका युवतीवर बलात्कार करण्यास गुन्हेगार कसा धजावू शकतो, हा खरा प्रश्न आहे. पुणे परिसरातील बोपदेव घाटात एका युवतीवर सामूहिक बलात्कार झाल्याची घटना ताजी असतानाच आणखी एक गुन्हा घडल्याने, जुन्या घटनांतूनही प्रशासन काही धडा घेत नाही, हेच दिसून येते. यामुळे कोणी ङमहाराष्ट्राचा बिहार झाला,फ असे म्हटले, तर ते चुकीचे नाही; परंतु अशा टीकेने कारभाऱ्यांना मिरच्या झोंबतात आणि ङतुमच्या काळात आणि आमच्या काळात म असा आरोप- प्रत्यारोपांचा खेळ सुरू होतो. त्यातून साध्य काहीच होत नाही. मात्र, गुन्हेगारांना धाक राहिला नसल्याचे आणि त्यांना रोखण्यासाठी पोलिसांचे उपाय अपुरे असल्याचे वारंवार घडणाऱ्या गुन्ह्यांमधून दिसून येते. दररोज सुमारे आठशे बसगाड्या आणि हजारो प्रवाशांची वर्दळ असलेल्या स्वारगेट स्थानकात २२ सुरक्षारक्षक असून, सदोदित ङसीसीटीव्हीफची नजर असते, मग हा इतका भीषण प्रकार कोणाच्याच लक्षात कसा आला नाही? या बसपासून जवळच सुरक्षारक्षकाची केबिन आहे, पण या घटनेकडे रक्षकांचे लक्ष कसे गेले नाही? संबंधित आरोपी हा सराईत गुन्हेगार असून, काही दिवसांपूर्वीच त्याच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती. असा आरोपी पोलिस ठाण्याजवळच बलात्कारासारखा गुन्हा करण्यास धजावतो, यातूनच गुन्हेगारांना पोलिसांचा किती ङधाकफ आहे, हे दिसते. समोरच असलेल्या पोलिस ठाण्यातील गुन्हेगारांच्या यादीत बलात्कारी आरोपीचा फोटोही लागलेला आहे. या आरोपीचे राजकीय लागेबांधे असल्याचेही उघड झाले आहे. मग राजकीय आश्रयाने अशा गुन्हेगारांना कायद्याची भीती वाटेनाशी होते का, हाही प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतो. पोलिस व सुरक्षारक्षकांची या भागात नियमित गस्त असती, तर असे गुन्हे रोखणे शक्य झाले असते. आता सुरक्षारक्षकांना निलंबित करण्यात आले असून, परिवहन खात्यानेही सुरक्षिततेच्या उपाययोजनांच्या बैठकांचा सपाटा लावला आहे; पण अशा सार्वजनिक ठिकाणी महिलांना सुरक्षिततेची हमी देण्यात सर्वच यंत्रणा कमी पडल्या, असेच म्हणावे लागेल. यावर कडी म्हणजे, या गुन्ह्याला एक दिवसही लोटत नाही, तोच स्वारगेट स्थानकातून एका महिला कंडक्टरची पर्सही चोरीला गेली. यावरूनच तेथे गुन्हेगारांचा किती सुळसुळाट झाला आहे, हे दिसते. काही दिवसांपूर्वीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सर्व प्रकारची गुन्हेगारी मोडून काढण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, कडक कारवाई आणि प्रतिबंधात्मक उपायांच्या कृतीची जोड नसेल, तर ते निव्वळ शब्दांचे बुडबुडे ठरतात, हे लक्षात घेतले पाहिजे. गेल्या काही वर्षांपासून पुण्यात गुन्हेगारी टोळ्या वाढत असून, भर दिवसा लुटालुटीच्या घटना घडत आहेत. कोयता गँगचा उपद्रवही पुरता कमी झालेला नाही. पुण्यात पोलिसांची संख्या अपुरी असेल, तर ती वाढवायला हवी. त्याचबरोबर ङअर्थपूर्णफ हितसंबंध जोपासण्याऐवजी गुन्हेगारांवर वचक ठेवून कायदा-सुव्यवस्था प्रस्थापित करण्यावर भर द्यायला हवा. बलात्काराचा गुन्हा घडला, की शक्ती कायदा, जलदगती न्यायालयांची स्थापना आणि आरोपींना कडक शिक्षा देण्यासारख्या राणा भीमदेवी थाटातील गर्जना होतात. क्वचित आरोपींचा एन्काउंटफ करून ङन्यायफ दिल्याचे चित्र निर्माण होते; पण काही काळातच घडणारा नवा गुन्हा या घोषणांच्या फुग्यातील हवा काढून घेतो. गेल्या वर्षभरात पुण्यात बलात्काराचे ५०५ गुन्हे नोंदविण्यात आले. त्यापूर्वी, म्हणजे २०२३ मध्ये ही संख्या ४१० होती. येत्या आठवड्याभरातच आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा होत आहे. त्या पार्श्वभूमीवर राज्यातील महिलांविरुद्धच्या गुन्ह्यांकडे नजर टाकली, तर महिलांची सुरक्षितता आणि सबलीकरणाचा घोष किती फोल आहे, हे लक्षात येते. ङपुण्यात रात्री अपरात्रीही महिला निर्धास्त फिरू शकतात,फ असा पुण्याचा कधी काळी लौकिक होता

# रमजानः संयम, शुद्धता आणि सामाजिक एकात्मतेचा महिना - मोहम्मद फ़ैज़ान

रमजान महिना इस्लामिक कॅलेंडरचा नववा महिना आहे, जो विशेषतः मुस्लिम धर्मियांसाठी अत्यंत पवित्र आणि महत्त्वपूर्ण मानला जातो. या महिन्यात मुस्लिम लोक उपवास ठेवतात, विविध धार्मिक कृत्ये, प्रार्थना आणि दान यांमध्ये सहभागी होतात. रमजान महिना केवळ धार्मिक कर्तव्यांचा भाग नाही, तर हे एक मानसिक आणि शारीरिक शुद्धतेचे साधन आहे. ह्या महिन्यात उपवास ठेवण्याच्या मागे असलेली भावना ही संयम आणि आत्मनियंत्रणाशी संबंधित आहे. हा महिना संयम शिकवतो, आणि जीवनाच्या विविध क्षेत्रांमध्ये तो आत्म-नियंत्रण साधण्यासाठी एक गाइड म्हणून काम करतो. रमजानचा अर्थ आणि महत्त्व रमजानचा महत्त्वाचा अर्थ आहे मउपवासफ, जो शारीरिक आणि मानसिक शुद्धतेसाठी आहे. इस्लाममध्ये रमजान महिना उपवास करण्याचा एक विशेष कारण आहे, ज्यामुळे व्यक्तीला आपल्या इंद्रियावर नियंत्रण ठेवता येते. मुसलमान दिनातून सूर्योदयापूर्वी अन्न आणि पाणी घेऊन सूर्यास्तापर्यंत उपवास ठेवतात. उपवास करत असताना, केवळ अन्न आणि पाणीच नाही, तर वाईट विचार, वाईट शब्द, आणि वाईट क्रिया देखील टाळाव्यात. यामुळे एकात्मता, दयाळुता, आणि आत्म-नियंत्रणाच्या महत्त्वाचा अनुभव होतो. उपवासाचे शारीरिक आणि मानसिक फायदे उपवास केल्यामुळे शरीराला विश्रांती मिळते. आधुनिक वैद्यकशास्त्रानुसार, उपवास केल्यामुळे शरीरातील हानिकारक टॉक्सिन्स बाहेर पडतात आणि शरीर शुद्ध होते. शरीराचे पचन प्रणाली सुदृढ होऊन, पाचन संस्थेची कार्यक्षमता वाढते. यामुळे शरीराच्या इतर क्रियांवर सकारात्मक प्रभाव पडतो. रमजान महिना मानसिक शुद्धता आणि ताजेतवानेपणासाठी एक चांगला साधन असतो. उपवासामुळे, इंद्रियांवर नियंत्रण ठेवता येते, त्यामुळे मानसिक दृष्टीकोन बदलतो. शांति आणि संयम साधता येतो. तसेच, विचारांची शुद्धता आणि समर्पणाची भावना देखील प्रकट होऊ लागते. रमजान संयम आणि आत्म-नियंत्रण रमजान महिना संयम आणि आत्म-नियंत्रण शिकवतो. रोजच्या जीवनात आपल्याला अनेक मोह, इच्छा, आणि आव्हाने असतात. तेव्हा या सर्व गोष्टींवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. उपवासाने आपण फक्त अन्न आणि पाणीच नाही, तर आपले वर्तन, आपले विचार आणि आपल्या भावना देखील नियंत्रित करतो. यामुळे आपल्याला आपल्या जीवनातील अनावश्यक इच्छा, क्रोध, आणि इतर नकारात्मक विचारांवर विजय मिळवता येतो. जीवनात या प्रकारचा संयम वाढवून, आपण अधिक शांती, समर्पण, आणि समाधानाचा अनुभव घेऊ शकतो. आत्मशुद्धी आणि समाजशास्त्र रमजान महिना केवळ एक व्यक्तिचा अनुभव नाही, तर तो समाजातील एकात्मता आणि आपसी सहकार्याचे प्रतीक आहे. या महिन्यात मुस्लिम समुदाय विविध धर्मिक कृत्यांमध्ये सामील होतात, एकमेकांना मदत करतात आणि एकत्रितपणे प्रार्थना करतात. रमजानचा एक महत्वाचा भाग म्हणजे ङजकातफ (दान), जे गरीब आणि गरजू लोकांना दिले जाते. यामुळे समुदायात एकता आणि सहकार्य वृद्धिंगत होते. या महिने दरम्यान, एक व्यक्तीला आत्मशुद्धी साधण्याची संधी मिळते. त्याला केवळ आंतरिक नियंत्रण मिळवायला मिळते, तर बाह्य कार्यही सुधारता येतात. जर एक व्यक्ती आपल्या वर्तनावर नियंत्रण ठेवू शकतो, तर तो आपल्या इतर क्रिया आणि दृष्टीकोनवर देखील सकारात्मक प्रभाव टाकू शकतो. रमजान महिना एक प्रकारचा आध्यात्मिक साधना काल असतो, जो व्यक्तीला त्याच्या आयुष्यात योग्य निर्णय घेण्यासाठी आणि चांगले वर्तन स्वीकारण्यासाठी प्रेरित करतो. इतर धर्मिक कृत्यांसारखे, रमजान देखील एक आत्म्याच्या शुद्धतेचे साधन आहे. यामुळे आपला आचार विचार शुद्ध होतो, आपल्या अंतर्गत विश्वाला समजून घेण्याची क्षमता वाढते, आणि आपल्या जीवनात एका विशिष्ट ध्येयाची शुद्धता आणता येते. रमजान महिना मुस्लिम समुदायासाठी केवळ उपवासाचे किंवा धार्मिक कृत्यांचे महिना नाही, तर तो एक जीवनशैलीचा बदल घडवण्याचा महिना आहे. रमजान संयम, आत्मनियंत्रण, शुद्धता, आणि समाजसेवेचे महत्त्व शिकवतो. या महिन्यात शिकवलेल्या तत्त्वांचा उपयोग जीवनभर होऊ शकतो. जर या शिक्षणाला खऱ्या अर्थाने आत्मसात केले, तर ते फक्त आपली आध्यात्मिक स्थिती सुधारत नाही, तर आपल्या इतर मानसिक आणि शारीरिक पातळ्यांवर देखील प्रभाव टाकतो

# सदोष मनुष्यवधाच्या गुन्ह्यांत जामीन मंजूर

पोलीस भरती करणाऱ्या तीन तरुणांना एसटीने चिरडल्याची घटना पिंपळनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली होती. या प्रकरणी एसटीचे चालक कुलदीप मुसळे यांच्याविरुद्ध सदोष मनुष्य वधाचा गुन्हा पिंपळनेर पोलीस ठाण्यात दाखल झालेला आहे. या प्रकरणाचा युक्तिवाद ड. अक्षय मुळे यांनी केला. न्यायालयाने त्यांचा युक्तिवाद ग्राह्य धरून आरोपी कुलदीप मुसळे यांना जामीन मंजूर केला आहे. या प्रकरणी अधिक माहिती अशी की गोकुळ नवनाथ घोडके वय २८ वर्षे व्यवसाय शेती व हॉटेल चालक रा. घोडका राजुरी ता.जि बीड यांनी समक्ष पोलीस ठाणे पिंपळनेर येथे हजर येवुन फिर्याद दिली की बीड ते परळी जाणारे रोड लगत घोडका राजुरी शिवारात स्वराज नावाचे हॉटेल येथे सकाळी ५ वा सुमारास साफसफाई करत असतांना १९/०१/२०२५ रोजी सकाळी ५ ०५.३० वा सुमारास माझ्या हॉटेलचे समोर माझा पूतण्या नामे १) ओम सुग्रीव घोडके व आमच्या गावातील २) विराट बब्रुवान घोडके ३) सुबोध बाबासाहेब मोरे ४) अदित्य बळीराम डरपे ५) अदित्य लक्ष्मण घोडके सर्व रा. घोडका राजुरी असे घोडका राजुरी ते पिंपळगाव मोची फाटा ईथपर्यंत नेहमीप्रमाणे रनिंग करून माझे हॉटेल समोर रोडच्या बाजूला व्यायाम करत थांबलेले होते. मी माझ्या हॉटेल समोर साफसफाई चे काम करत होतो. सकाळी ०६.१० वा सुमारास बीड ते परळी जाणारे रोडने बीड कडून एक एसटी बस आली व रोड सोडून एसटी बस रोडच्या डाव्या बाजूच्या पंरव्यावर येऊन तेथे व्यायाम करणारे आमच्या गावातील मूलांना जोराची धडक दिली त्यावेळी सदर बस।) ओम सुग्रीव घोडके २) विराट बब्रुवान घोडके ३) सुबोध बाबासाहेब मोरे सर्व रा घोडका राजूरी ता जि बीड यांचे अंगावर एसटी बस गेली. तेंव्हा त्या चालकाने त्या ठिकाणी बस उभा न करता त्यांना फरपटत गाडीचे खाली ओढत घेऊन गेला. त्यामूळे त्यांना गंभीर दुखापत व अंगाचा चेंदामेंदा होऊन १) ओम सुग्रीव घोडके व आमच्या गावातील २) विराट बब्रुवान घोडके हे जागीच मरण पावलेले दिसले व सूबोध बाबासाहेब मोरे हा जिवंत होता त्याची हालचाल सूरू होती. सदर मूलासोबत असलेले ४) अदित्य बळीराम डरपे ५) अदित्य लक्ष्मण घोडके सर्व रा. घोडका राजुरी ता जि बीड यांनी एसटी बस अंगावर येत असल्याचे पाहून त्यांनी रोडच्या बाजूला उड्या मारल्याने ते पण जखमी झालेले आहेत. त्यानंतर अपघात करून गेलेली एसटी बस च्या चालकाने एस टी बस तेथून पूढे इंग्लीश स्कूल जवळून वळऊन पून्हा बीड कडे वेगाने जात असताना दिसला त्यावेळी मी रोडवर येऊन एसटी बस चा नंबर पाहीला तो MH14BT१४७३ असा होता. त्यानंतर मी ताबडतोब गावातील माझे नातेवाईक व इतर मूलांचे नातेवाईकांना फोन केला व घटनेची माहिती दिली. त्यानंतर थोड्याच वेळात सदर मूलांचे नातेवाईक व इतर गावातील लोक घटनेच्या ठिकाणी आले होते. घटनेमध्ये जखमी झालेला सूबोध बाबासाहेब मोरे यास आमच्या गावातील पिराजी डरपे यांचे जिप मध्ये घालून उपचार कामी बीड येथे घेऊन गेले व जागीच मयत झालेले १) ओम सुग्रीव घोडके २) विराट बब्रुवान घोडके असे दोन्ही मूलांना बीड येथून रुग्नवाहीका बोलाऊन घेऊन सरकारी दवाखाना येथे घेऊन गेलोत. आम्ही बीड ला जाते वेळी घटना करून गेलेली एसटी बीड कडे जाताना पांगर बावडी शिवारमध्ये रोडच्या बाजूला विट भट्टी जवळ मातीच्या ढिगाऱ्यावार जाऊन बंद अवस्थेत उभी असलेली दिसली. त्यावेळी पण मी व आमच्या गावातील लोकांनी एसटी बस पाहीली असता तिचा नंबर MH१४BT१४७३ असा असल्याचे दिसले. त्यावेळी पिंपळनेर पोलीस स्टेशन चे पोलीस घटनास्थळावर आले होते.

# शितावरून भाताची परीक्षा? तशीच गावठाण विस्तारात सरकारची ?

भारतात ८५ टक्के ओबीसी एससी एसटी या शोषित मागास वर्गावर वैदिक हिंदू उच्चवर्णीयांनी धार्मिक राजकीय सामाजिक आर्थिक गुलामगिरी लादली होती. आजही आम्ही आगरी कोळी कराडी भंडारी ओबीसी महात्मा फुले आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितल्या प्रमाणे गुलामीचे जीवन जगत आहोत. आमची घरे गावठाणे अतिक्रमित अनधिकृत गलिच्छ वस्त्या ठरविणारे वर्तमानात फडणवीस पवार शिंदे लोढा अंबानी हे उच्चवर्णीयच आहेत ना?. हजारो वर्षे प्रतिकार न करण्याची,अन्याय सहन करण्याची गुलाम मानसिकता हेच बहुसंख्य मागास भारतीयांचे वैशिष्ट् य ठरले. राजकीय सत्ता कुणाचीही असो.अगदी इंग्रज पोर्तुगीज फ्रेंच मोघल या परकियांनी केलेल्या अत्याचारांची असो. आम्हाला काय करायचे आहे? हजारो वर्षे जे चालते ते चालणार,हा हिंदू धर्म संस्कार आजही तसाच घेऊन लोक चालले आहेत.याच देशात आम्ही गावांचे शहरांचे नियोजन जगाने आदर्श घ्यावे असे हडप्पा मोहेंजोदडो या ऐतिहासिक शहरात पाच हजार वर्षा पूर्वी केले होते. आपल्या रयतेच्या सुरक्षेसाठी डोंगरी आणि सागरी किल्ले बांधणारे आर्किटेक्ट छत्रपती शिवराय हे साऱ्या देशी आणि विदेशी शत्रूंना आम्ही दिलेले कालसुसंगत उत्तर आहे.भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आबेडकर सांगतात सर्व प्रकारची विषमता भेदाभेद, जन्माधारित वंश वर्ण यांचे श्रेष्ठत्व नाकारून आम्ही भारताचे लोक या देशात समतेच्या विचाराने देशाची सत्ता सांभाळू.आम्हाला कोणत्याही देवाची आवश्यकता नाही.लिखित धर्मग्रंथ धर्मगुरु गरजेचा नाही.लोक हेच लोकशाहीचे खरे मार्गदर्शक आहेत.मग शहरांचे नियोजन होते. खेड्यांचे का नाही? हाच मोठा प्रश्न आहे. प्रत्येक वेळी आमच्यावर सत्ता गाजविणाऱ्या देशी ब्राह्मण क्षत्रिय वैश्य आणि विदेशी सत्ताधारी लोकांना आमच्या दुरावस्थेसाठी दोष देणे आम्ही थांबवले पाहिजे.असे मला वाटू लागले आहे.अत्त दीप भव हा आई एकविरेचा सुपुत्र भगवान बुद्ध यांचा २५०० वर्षापूर्वी जगाला दिलेला संदेश मी समजून घेण्याचा प्रयत्न केला.तेव्हा लक्षात आले.आपल्याला आलेली बरीचशी संकटे ही आमच्या चुकांमुळे किंवा वास्तव परिस्थितीकडे दुर्लक्ष केल्यामुळे आली आहेत.त्यातही संधी शोधून आम्ही मार्ग काढू शकतो.जीवनाचे हे वास्तव, वर्तमान प्रश्न समजून घेण्यासाठी अत्यंत महत्वाचे तत्वज्ञान आहे असे मला वाटते. माझ्या परिवारासाठी मुलांसाठी घर असावे?. ही नैसर्गिक भावना निसर्गात समस्त प्राणिमात्रात आढळते.हे निसर्ग सत्य आहे. ब्रह्म सत्य आहे जग असत्य आहे.हा शंकराचार्य यांचा निष्कर्ष निसर्ग विरोधी आहे.जगण्यासाठी आम्हाला घर हवे आहे.गावठाण हवे आहे.जमिनीवरचे जगणे महत्वाचे आहे.हे चार्वाक बुद्ध महावीर यांनी सांगितले.भारताने हा भौतिक विचार मानव निसर्ग पर्यावरण यांचा विचार स्वीकारला असता?.तर इंग्लंड अमेरिके प्रमाणेच आमची गावे गावठाणे परिपूर्ण झाली असती.मोक्ष मुक्ती आकाशातल्या देवाकडे आहे.असे सांगणाऱ्या लोकांनी भारतीय माणसाला निष्क्रिय बनविले असा माझा आरोप आहे .म्हणूनच २००५ पासून जमीन जंगल समुद्र घरे गावठाण या प्रश्नावर काम करताना अपेक्षित कार्यकर्ते मला मिळत नाहीत.एक नक्की उरणच्या समुद्र किनारी एक उत्तम घर मी माझ्या कुटुंबास आणि मित्र परिवार आणि हितचिंतकाच्या स्वागतासाठी याच जन्मी अत्यंत गरिबीत कमी पैशात उभे करू शकलो हीच मोक्ष हीच मुक्ती आहे असे मी समजतो.घरे आणि गावठाणे ओबीसी एससी एसटी अल्पसंख्याक मुस्लिम ख्रिश्चन ईस्ट इंडियन यांची अनधिकृत ठरून तुटत आहेत.वर्तमान मुंबई ठाणे रायगड पालघर येथील वास्तव महाराष्ट्र आणि देशात दिसत असूनही यावर लढा का उभा राहत नाही? लोकसभा राज्यसभा विधान परिषद विधानसभा येथे चर्चा का होत नाही? न्यायालये मागासवर्गीय ८५ टक्के लोकांच्या विरोधात निर्णय का देत आहेत? अभिजन ब्राह्मण क्षत्रिय वैश्य यांच्या वस्त्या का तुटत नाहीत.? हे सारे प्रश्न लोकप्रतिनिधी, प्रशासन आणि भारतीय न्यायवस्था आणि पत्रकार बांधवांना मी जाहीरपणे विचारत आहे. लोकशाही पद्धतीने निवडून आलेल्या लोकांची जेवढी सभागृहे आणि लोकप्रतिनिधी आहेत. तशीच ग्राम पंचायत आहे.लोकसभेत नसेल असा थेट लोकांचा सहभाग ग्राम पंचायत आणि ग्राम सभेत होत असतो.मग त्यांनी ठराव घेऊन मान्यता दिलेले गाव गावठाण अनधिकृत अतिक्रमित आहे हे कोणत्या न्यायाने सरकार म्हणते.? आज महामुंबई परिसरातल्या साऱ्या कोळीवाडे गावठाणे आणि झोपडपट्ट्यांचा हा प्रश्न देशाला आहे.मोठ मोठ्या युनिव्हर्सिटी संशोधन संस्था न्यायसंस्था यांनी याचे उत्तर द्यावे.ही नम्र विनंती आहे.गावठाण विस्तार आणि नियोजन यात काम करीत असताना मला कळलेले वास्तव असे आहे. गावचे नियोजन करण्यासाठी मायबाप सरकारने स्वतंत्र भारतात आजही शहर नियोजनकार, आर्किटेक्ट दिलेला नाही.असे उरण पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांनी नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले.



राजाराम पाटील,
मो.८२८६०३१४६३,
शेतकरी प्रबोधिनी!
उरण रायगड,

# वाल्मिक कराड जेलमध्ये व्हीसीद्वारे २-२ तास लोकांशी गप्पा मारतो,

## वाल्मिक कराड जेलमध्ये व्हीसीद्वारे २-२ तास लोकांशी गप्पा मारतो, अंजली दमानियांच्या दाव्यावर काय म्हणाल्या करूणा शर्मा ?

वाल्मिक कराड जेलमधून व्हीसीद्वारे लोकांशी गप्पा मारतोय,२-२ तास तो लोकांशी बोलतो असा आरोप अंजली दमानिया यांनी केला आहे. कराडला तुरूंगात चहा-नाष्टाही दिला जातो असं म्हणत अंजली दमानिया यांनी पुन्हा एकदा कराडला दिल्या जाणा-या सुविधांबद्दल सवाल उपस्थित केला. त्यांच्या याच आरोपांवर आता करुणा शर्मा यांनीही प्रतिक्रिया दिली आहे. अंजली दमानिया यांचे जे आरोप आहेत, त्यावर मी ठामपणे शिक्कामोर्तब करू शकते. मी स्वतः त्या बीड जेलमध्ये १६ दिवस राहिले आहे, त्यामुळे दमानिया यांचं म्हणणं नक्कीच खरं आहे, असं मी सांगू शकते, आपण त्यांच्याशी सहमत असल्याचं करूणा शर्मा यांनी सांगितलं.

काय म्हणाल्या करूणा शर्मा ? मी १६ दिवस बीडच्या त्या तुरूंगात राहिले आहे, माझा नवरा माझ्यासोबत पण अर्धा-अर्धा तास बोलत होता. मी ६ दिवस अन्नही खाल्लं नव्हतं, फक्त एका सफरचंदावर मी होते. तेव्हा मला जेलमध्ये असतानाही चांगल्या हॉटेलचं खाणं पाठवण्यात आलं होतं. धनंजय मुंडेंनी मला फोन करू सांगितलं की हे फाईव्हस्टार हॉटेलचं चांगलं जेवणं पाठवलंय, तू खा हे. ते माझ्याशी अर्धा तास फोनवरही बोलायचे.त्यामुळे अंजली दमानियांनी वाल्मिक कराडला मिळणा-या सोयींबद्दल जो दावा केला आहे, तो १०० टक्के बरोबर आहे.त्यांच्या आरोपांवर माझा विश्वास आहे, असं करूणा शर्मा म्हणाल्या.

धनंजय मुंडेंसारखे लोक मंत्रालयात नकोत

धनंजय मुंडेंसारखे लोक मंत्रालयात नकोत, असे म्हणत त्यांनी मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी करत पुनरुच्चार केला. वाल्मिक कराड हा धनंजय मुंडे यांची सावली आहे, ताच्याकडे हजारो कोटींची मालमत्ता आहे, असा दावा त्यांनी केला. त्यासाठीच आज राजीनाम्याची मागणी केली जात आहे, त्यामुळे धनंजय मुंडेंनी राजीनामा दिलाच पाहिजे,असे त्या म्हणाल्या. आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याचंही त्यांनी नमूद केलं, अंजली दमानियांचा दावा काय ?




बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणात मंत्री धनंजय देशमुख यांच्या जवळचा वाल्मिक कराड हाच मास्टरमाईड असल्याचा दावा सीआयडीने दाखल केलेल्या दोषारोपपत्रात करण्यात आल्याचे समोर आले आहे. याप्रकरणात सातत्याने कराड आणि मंत्री मुंडे यांच्यावर टीकेची झोड उठली आहे. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी तर दोघांवर टीकेची झोड उठवली, त्यांनी कराडवर अनेक आरोपही केले. वाल्मिक कराड हॉं जेलमध्ये बसून व्हिडीओ कॉलद्वारे २-२ तास लोकांशी बोलतो, असा आरोप दमानियांनी केला. दोनच दिवसांपूर्वी तिथल्या जेलच्या अधिका-यांनी पत्र लिहीलं की आमचे सीसीटीव्ही चालतं नाहीत. याचाच अर्थ त्यांना कोणालाही काहीही उत्तर द्याची गरज नाही, असं त्याचं म्हणणं असल्याचा दावा दमानिया यांनी केला. कोणीही येईल आणि कोणीही वाल्मिक कराडला भेटेल. आता आम्हाला अशी माहिती मिळत आहे की कराडचा चहा, नाश्ता, जेवण हे सगळं ऐशोआरामात मिळत आहे, त्याची अगदी बडदास्त ठेवली जात आहे, असा आरोप दमानिया यांनी केला. एवढंच नाही तर व्हीसीद्वारे ते २-२ तास लोकांशी गप्पा मारतात, वकिलांच्या नावाखाली कोणीही त्यांची भेट घेत आहे, असा आरोपही दमानियांनी केला असून या सुविधांबद्दल सवाल उपस्थित केला.

# महादेव मुंडे खून प्रकरणः आरोपींच्या अटकेसाठी ज्ञानेश्वरी मुंडेंचे कुटुंब, नातेवाईकांसह उपोषण सुरू



बीड/ परळीः परळी येथील बँक कॉलनीतील पिग्मी एजंट महादेव मुंडे यांच्या खून प्रकरणास १६ महिने उलटले असताना ही मारेकरी मोकाटच आहेत. या प्रकरणातील आरोपींना लवकरात लवकर अटक करावी या मागणीसाठी महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मु डे व मु डे परिवाराच्या वतीने आजपासून ( दि.३ ) बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू करण्यात आले आहे. महादेव मुंडे यांचा तीक्ष्ण हत्याराने खून करून त्यांचा मृतदेह परळीच्या तहसील कार्यालयासमोरील जागेत २२ ऑक्टोबर २०२३ रोजी आढळून आला. याप्रकरणी २२ ऑक्टोबर रोजी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. या प्रकरणी अद्यापही एका आरोपीसही अटक करण्यात आलेले नाही. १६ महिन्यानंतरही आरोपी अटक नसल्याने ज्ञानेश्वरी मुंडे यांनी उपोषणाचा मार्ग अवलंबविण्याचा निर्णय घेतला आहे. गेल्या महिन्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे, आष्टीचे भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी ज्ञानेश्वरी मुंडे यांची भेट घेतली व मुंडे कुटुंबाचे सांत्वन केले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार ४ मार्च २०२५
https://lokaarambh.com



# केज तालुक्यात महिलेवर अत्याचार : पोलिसांनी आरोपीला घेतला ताब्यात



केज : केज तालुक्यात एका विवाहित महिलेवर एका तरुणाने अतिप्रसंग केल्याची घटना घडली आहे. याबाबतची माहिती अशी की, केज तालुक्यातील एक विवाहित महिला ही शेतात काम करीत असताना जवळ कुणी नसल्याची संधी साधून तिच्या भावकितील एका नराधमाने ज्वारीच्या पिकात तिच्यावर बळजबरीने अतिप्रसंग केला. तसेच कोणाला जर सांगितले तर जिवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर पीडित महिलेच्या तक्रारी वरून केज पोलीस ठाण्यात त्या नराधमा विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. गुन्हा दाखल होताच पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले आहे. आरोपीला न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्याला ३ मार्च पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणी पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप मांजरमे हे तपास करीत आहेत.

# अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला लाडकी बहीण योजनेबाबत मुख्यमंत्र्यांची गुड न्यूज

मुंबई : राज्यात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरु आहे. या योजनेमुळे महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महायुतीला मोठे यश मिळाले. त्यानंतर ही योजना बंद होणार? अशी टीका विरोध पक्ष करत आहे. योजनेतून दहा लाख महिलांना वगळले, असा आरोप केला जात आहे. त्यावर राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा पूर्वसंध्येला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्वाची माहिती दिली आहे. त्यात ही योजना बंद होणार नाही, असे रोखठोकपणे त्यांनी सांगितले. तसेच महिलांची संख्या कमी का झाली? त्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, राज्यात लाडकी बहीण बंद होणार नाही. हीच नाही



तर राज्यातील कोणतीही योजना बंद होणार नाही. या योजनेत पात्र असलेल्यांना पैसे दिले जातील. परंतु नियमाच्या बाहेर जे आहेत, त्यांना या योजनेतून बाहेर ठेवावे लागणार आहे. कारण ङ्कॅगफ्ने त्याबाबत आपल्यावर टाकले बंधन आहे. त्यानुसार, पात्र लोकांनाच कोणत्याही योजनेची मदत करता येते. अपात्र लोकांना मदत करता येणार नाही. त्यामुळे यामध्ये कोणतीही कपात केली जाणार नाही. विरोधकांचा आरोप चुकीचा आहे, असे फडणवीस यांनी सांगितले.लाडकी बहीण योजनेचे पैसे २१०० रुपये करण्याचे आश्वासन महायुतीने विधानसभा निवडणुकीत दिले होते. सध्या या योजनेत १५०० रुपये महिना पात्र महिलांना दिला जातो. आता २१०० रुपये करण्याचा निर्णय या अर्थसंकल्पीय अधिवेशनात होण्याची शक्यता आहे. त्याबाबतचे संकेत यापूर्वी अर्थमंत्री अजित पवार यांनी दिले होते.

# बाबासाहेब पोटभरे महाराष्ट्ररत्न गौरव पुरस्काराने सन्मानित

अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशन येथे कार्यरत असणारे पोलीस हेडकॉन्स्टेबल बाबासाहेब पोटभरे यांना विश्वनाथ फाउंडेशन च्या वतीने सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल महाराष्ट्ररत्न गौरव पुरस्कार सिने अभिनेत्री प्राजक्ता गायकवाड यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. बाबासाहेब पोटभरे हे पोलीस दलामध्ये उत्कृष्ट सेवा तर देतच आहेत पण आपल्याला समाजाचे काहीतरी देणे लागते या हेतूने स्वखर्चाने वृक्षारोपण करणे, जखमी प्राण्यांवर उपचार करणे, गरीब असाह्य लोकांची



सेवा करणे, शेती तरसामाजिक कार्यात देखील हिरीरीने सहभाग घेत असतात.महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ५० सत्कारमूर्तींचा महाराष्ट्र गौरव पुरस्कार २०२५ हा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.विश्वनाथ फाउंडेशन, दैनिक सुधाकर आणि इन्फोइड टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेड च्या संयुक्त विद्यमाने सावित्रीबाई फुले स्मारक गंजपेठ पुणे येथे २८ फेब्रुवारी २०२५ रोजी या भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते या पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन शंकर चव्हाण यांनी केले होते या कार्यक्रमासाठी प्रमुख उद्घाटक म्हणून प्रसिद्ध सिने अभिनेत्री प्राजक्ता गायकवाड या उपस्थित होत्या प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध सेने दिग्दर्शक ओमकार माने व इतर मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सन्मानाबद्दल अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विनोद घोळवे, वाहतूक विभागाचे घोडके साहेब, पोलीस हेड कॉन्स्टेबल बाबासाहेब आचार्य, पोलीस हेड कॉन्स्टेबल भोले साहेब, इत्यादीने अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# संस्कार विद्यालयात आजी-आजोबा मेळाव्याचे आयोजन

संस्कार विद्यालयातील बालवाडी या विभागामध्ये आजी-आजोबा मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. मेळाव्याची सुरुवात माता सरस्वतीच्या पूजनाने झाली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक डॉक्टर .श्रीअनुराग पांगरीकर साहेब तसेच मेळाव्यास प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे संचालक श्री सुनीलराव शिरसागर हे लाभले होते. पालक प्रतिनिधी म्हणून श्री झेंडे आजी आजोबा यांची उपस्थिती होती. मेळाव्यामध्ये आजी-आजोबांसाठी प्रश्नमंजुषाचा कार्यक्रम घेण्यात आला . अध्यक्षीय समारोपात डॉक्टर पांगरीकर साहेबांनी बालमनावर परिणाम



करणाऱ्या विपरीत गोष्टींचा उल्लेख केला. चॉकलेट, आईस्क्रीम ,मोबाईल, टीव्ही यांच्या अतिवापराने बालपणात कोणकोणत्या समस्या येतात याबद्दलची अधिक माहिती साहेबांनी दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती मोहरीरताई ने केले . कार्यक्रमाच्या यशासाठी सर्व बालवाडीच्या ताईंनी परिश्रम घेतले. मेळाव्याच्या यशासाठी मुख्याध्यापिका श्रीमतीजाधव ताई यांचे मार्गदर्शन लाभले.

# आदिवासी कातकरी मुला मुलींची अनुदानित आश्रमशाळा बाबरेच्या मुलींचे सुयश

अखिल भारतीय मागासवर्गीय समाज प्रबोधन संस्था संचलित आदिवासी कातकरी मुला मुलींची अनुदानित आश्रमशाळा बाबरे, ता. शहापूर या आश्रमशाळेतील विद्यार्थीनी कुमारी रोहिणी जाधव व कुमारी गौरी पारधी या मुलींनी स्नेहश्री फाउंडेशन या संस्थेमार्फत आयोजित केलेल्या राज्यस्तरीय संविधान प्रास्ताविका पाठांतर स्पर्धेमध्ये यश मिळविले. प्रित्यर्थ महाराष्ट्र राज्याचे समाजकल्याण मंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते शिवसेना भवन येथे सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र राज्याचे आदिवासी विकास मंत्रालयाचे प्रधान सचिव विजय



वाघमारे व उपसचिव रविंद्र जाधव यांना आदर्श कृतिशील मुख्याध्यापिका आशा नवनाथ रणखांबे यांनी विद्यार्थिनी समवेत भेटून शाळेची माहिती दिली. विशेष म्हणजे यांच्या पहिल्या पिढीने पुस्तकाला हात लावला आहे. आजही त्यांचे पालक विटभट्टीवर काम करीत आहेत. आम्हाला आय. ए. एस आय. पी. एस व्हायचे आहे अशी महत्वकांक्षाही व्यक्त केली. या दोन्ही विद्यार्थिनींचे सचिवांनी कौतुक केले. संस्थेचे अध्यक्ष समीर सीताराम गायकवाड यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिका संघटित व्हा व संघर्ष करा ! हा ध्यास आहे व त्याचे हे यश आहे असे सांगितले.

# राजेंद्र विठ्ठल जगतकर यांच्या आई केवळाबाई विठ्ठलराव जगतकर यांचे दुःखद निधन

परळी-प्रतिनिधी राष्ट्रवादीचे युवा नेते राजेंद्र विठ्ठल जगतकर यांच्या आई केवळाबाई विठ्ठलराव जगतकर यांचे परळी येथील एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरू होते. उपचारादरम्यान त्यांचे दुःखद निधन झाले आहे. मृत्यू समई त्यांचे वय ६५ वर्ष होते. त्यांच्या पश्चात तीन मुले, तीन मुली सुना, नातवंडे असा भरगच्च परिवार आहे. केवळाबाई जगतकर ह्या मितभाषी, मनमिळावू स्वभावाच्या व



धार्मिक वृत्तीच्या होत्या. त्यांच्या निधनाने जगतकर गल्ली भीम नगर परळी येथे शोककाळ पसरली आहे. त्यांचा अंत्यविधी ०३ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ६ वा. शांतीवन स्मशानभूमी जगतकर गल्ली भीम नगर येथे होणार असल्याची माहिती कुटुंबीयांकडून देण्यात आली आहे. जगतकर परिवारावर कोसळलेल्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

# धर्मवीर छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठानची बैठक



गाव देवठाणा तालुका धारूर जिल्हा बीड येथे धर्मवीर छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष बाळराजे आवारे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व मराठवाडा संपर्क प्रमुख आण्णासाहेब जाधव यांच्या नेतृत्वाखाली बैठक संपन्न होऊन सामाजिक, मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली यावेळी धर्मवीर छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठान च्या माध्यमातून होत असलेल्या मागेल त्याला शिवस्मारक कार्याचा आढावा घेतला यावेळी गावातील मित्र मंडळी भागवत सोळंके, पुरुषोत्तम सोळंके, दीपक सोळंके ,विनायक सोळंके ,मधुकर सोळंके ,गणेश सोळंके ,जिजा काशीद , राजेभाऊ सोळंके, नामदेव सोळंके ,सतीश सोळंके ,अतुल सोळंके, सूर्यकांत सोळंके,संदीप सोळंके ,विवेक सोळंके , महादेव सोळंके , अजय सोळंके सह गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.



गेवराई तालुका शिक्षक सहकारी पत संस्थेला विभागीय सहनिबंधक बिर्ले साहेब, मानुरकर साहेब शासकीय विशेष लेखापरीक्षक श्रेणी १छत्रपती संभाजीनगर व गलांडे साहेब शासकीय विशेष लेखापरीक्षक श्रेणी २गेवराई यांनी सदिच्छा भेट देऊन कामाची पहाणी करुन उत्कृष्ट शेरा देऊन समाधान व्यक्त केले यावेळी त्यांचा सन्मान करतांना संस्थेचे चेअरमन विष्णु खेत्रे साहेब,मानद सचिव अर्जुन जाधव साहेब, संचालक जितेंद्र दहिफळे सर कर्मचारी शामसुंदर कुलकर्णी, राजाभाऊ शिंदे, सुनील कांबळे, अशोक मोटे, बाळासाहेब खंडागळे दिसत आहेत.

# शिवसंग्रामच्या जिल्हा, तालुका व शहर पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या

## शिवसंग्रामचे संघटन मजबूत करा-डॉ.ज्योती मेटे

बीड-प्रतिनिधी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने शिवसंग्राम संगठना मजबूत करण्यासाठी संघटना बांधणी वर शिवसंग्राम अध्यक्ष डॉ.ज्योती विनायकराव मेटे यांच्या कडून विशेष लक्ष दिले जात आहे. यात दि. ०२ मार्च रविवार रोजी शिवसंग्राम भवन येथे कार्यकर्ते पदाधिकारी यांची बैठक पार पडली यात जिल्हा, तालुका आणि शहर पदाधिकारी यांच्या निवडी करण्यात आल्या या प्रसंगी शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, जिल्हाध्यक्ष प्रा.सुभाष जाधव, शहराध्यक्ष सुहास पाटील, तालुका अध्यक्ष तथा कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक पंडित माने, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक सचिन काळकुटे, खरेदी विक्री संघाचे संचालक गोपीनाथ घुमरे, मजूर सहकारी संघाचे संचालक बाळासाहेब हावळे आदीच्या उपस्थिती होती. आगामी काळात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी शिवसंग्रामची मोर्चे बांधनी सुरू करण्यात आले आहे. मागील महिन्यात शिवसंग्रामची जिल्हा कार्यकारणी बरखास्त करत डॉ.ज्योती मेटे यांनी नवीन कार्यकारिणी जाहीर केली यानंतर आता जिल्हा, तालुका व शहर पदाधिकारींची निवड करण्यात आली आहे. या निवडी दरम्यान डॉ.ज्योती




मेटे यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला आणि शिवसंग्राम संघटन मजबूत करा अशी साद उपस्थित कार्यकर्त्यांना घातली. या निवडीत सचिन कोटूळे जिल्हा उपाध्यक्ष,रामदास नाईकवाडे जिल्हा उपाध्यक्ष, युवक जिल्हाध्यक्ष सुनील कुटे, सुनील शिंदे सामाजिक न्याय विभाग जिल्हाध्यक्ष, धर्मराज मागदे सेवा निवृत्त शिक्षक संघटना जिल्हाध्यक्ष, गीतांजली डोरले युवती जिल्हाध्यक्ष,गणेश मोरे वकील संघ जिल्हाध्यक्ष,अशोक लोकरे सांस्कृतिक विभाग जिल्हाध्यक्ष, मनीष पाटील विद्यार्थी आघाडी कार्याध्यक्ष,पिंटू भागडे तालुका उपाध्यक्ष, राजेंद्र माने तालुका उपाध्यक्ष, शेषराव तांबे बीड शहर उपाध्यक्ष, सातीराम ढोले बीड शहर उपाध्यक्ष ,शेख नदीम बीड शहर उपाध्यक्ष, गणेश धोंडरे बीड सचिव, कुंदन गायकवाड विभाग प्रमुख, हरिश्चंद्र ठोसर विभाग प्रमुख यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या.

# विमा कंपनी तयार; शासनाने जबाबदारी झटकली

## खरिपाच्या पीकविम्यासाठी किसान सभेचे लोकप्रतिनिधींना निवेदने

बीड । प्रतिनिधी खरीप २०२४ हंगामातील नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना लवकरात लवकर पीक विमा मिळावा याकरिता अखिल भारतीय किसान सभेकडून मागील महिन्यात विमा कंपनी कार्यलयासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले होते.खरीप २४ मधील पीक विमा बाबत शासन हिस्सा विमा कंपनीला न दिल्याने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याची ४ महिन्या पासून प्रतीक्षा करावी लागत असल्याची बाब समोर आली. लवकरात लवकर शासन हिस्सा विमा कंपनीला देय करून शेतकऱ्यांना विमा मिळेल असे आश्वासन शासन प्रतिनिधी, विमा कंपनी आणि लोक प्रतिनिधी मार्फत लेखी स्वरूपात मिळाल्याने हे बेमुदत धरणे आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे. मात्र अद्याप ही शासन आपली जवाबदारी स्वीकारण्यास तयार नसल्याने किसान सभेने जिल्ह्यातील लोक प्रतिनिधीला या प्रश्नाबाबत अवगत करण्याची भूमिका घेतली आहे.याचाच भाग म्हणून आ.विजयसिंह पंडित, आ.नमिता मुंदडा यांना या बाबत निवेदन देण्यात आली. मागील महिन्यात दि १७ फेब्रुवारी रोजी ऍग्रीकल्चर पिकविमा कंपनीच्या दारात दोन वर्षापूर्वीच्या मंजूर असलेल्या २०२३ २०२४ खरीप व रब्बी हंगामाचा पिकविमा अजून देखील शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केलेला नसल्यामुळे बेमुदत धरणे धरण्यात आले होते. त्या धरणे आंदोलनातील चर्चेत पिकविमा कंपनीकडून दखल घेऊन २०२३ खरीप प्रलंबित पिक विमा वाटप चालू आहे परंतु २०२४ चा पिक विमा वाटण्यासंदर्भात सरकारचा प्रीमियम वाटा (हिस्सा) कंपनीला न दिल्याचे सांगण्यात आल्याने संतप्त शेतकऱ्यांचा धरणे आंदोलनाचा निर्धार अधिक घट्ट झाला होता.परंतू प्रशासनाचे प्रतिनिधी, विमा कंपनीचे अधिकारी आणि सरकारचे प्रतिनिधी म्हणून आमदार सुरेश धस यांनी आंदोलनाला भेट देऊन मुख्यमंत्री, अर्थमंत्री आणि कृषिमंत्री यांच्याशी बोलून ताबडतोब सरकारचा प्रीमियम देण्यासंदर्भात कारवाई करण्याचे आश्वासन दिले होते व विमा कंपनीने २०२३ चा विमा फेब्रुवारी अखेरपर्यंत वाटण्यासंदर्भात लेखी आश्वासनानंतर किसान सभेच्या बेमुदत धरणे आंदोलनास स्थगिती देण्यात आली होती. परंतू फेब्रुवारी मावळून मार्च महिना उजडला तरी सुद्धा सरकार



आणि कंपनी यांच्या गोंधळात शेतकऱ्यांच्या खात्यात पैश्याचा संदेश काही मिळेना म्हणून आत्ता किसान सभेने जिल्ह्यातील सर्वच लोकप्रतिनिधीशी भेटून या प्रश्नावर विधानसभेत आवाज उठवून हक्काचे शेतकऱ्यांचे पैशे तात्काळ वितरित करण्यासाठी सरकारला भाग पाडावे म्हणून निवेदन देण्यात येत आहेत. आ.विजय सिंह पंडित, आ. नमिता मुंदडा यांना भेटून चर्चा करून निवेदन देण्यात आले याप्रसंगी कॉ भगवान बडे, भानुदास बाप्पा देशमुख, कॉ. विनायक राजमाने, कॉ.देविदास जाधव, कॉ.सिताराम सोळंके, कॉ. राऊत कॉ सुहास जायभाय कॉ कुंडलिक खेत्री उपस्थित होते.बीड जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधीला निवेदन देऊन शेतकऱ्यांच्या हक्काची उधारी मागण्यासाठी किसान सभा शेतकऱ्यांची वसुली अधिकारी या भूमिकेनेच उतरली आहे.

# आरोपी दत्तात्रय गाडे याच्या गुणाट गावातील ग्रामस्थ संतापले

स्वारगेट एसटी बस अत्याचार प्रकरणातील आरोपी दत्तात्रय गाडे याला २८ फेब्रुवारीला अटक केली. त्याच्या अटकेवरुन श्रेयवादीची लढाई सुरु झाली आहे. गाडे याची माहिती देणा-यास पुणे पोलिसांना १ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. शेवटी पोलिसांनी त्याला गुणाट ग्रामस्थांच्या मदतीने पकडले. त्यानंतर गुणाट गावात एक लाखाच्या बक्षीसावरून श्रेयवाद सुरू असल्याच्या बातम्या आले. त्यामुळे गुणाट गावातील ग्रामस्थ संतप्त झाले. गावात कोणताही वाद नाही. आमच्या गावची बदनामी थांबवा. आम्हाला एक लाखाचे बक्षीस पण नको, असे ग्रामस्थांनी म्हटले आहे.

गावक-यांनी आरोपीला पकडले होतेःपुण्याच्या स्वारगेट बस स्थानकातील अत्याचार प्रकरणातील आरोपी दत्तात्रय गाडे हा गुणाट गावातील रहिवाशी आहे. त्याने पीडीत तरुणीवर अत्याचार केल्यानंतर पळ काढला होता. तो गुणाट परिसरातील शेतांमध्ये लपला होता. त्याची माहिती देणा-यास पोलिसांनी १ लाखाचे बक्षीस जाहीर केले होते. तब्बल ७२ तास गावात ड्रोन, डॉगस्कॉड तसेच पोलिसांची १३ पथके होती. अखेर गुणाट गावतील ग्रामस्थांच्या मदतीने पोलिसांना दत्ता गाडे याला पकडले. त्यानंतर काही माध्यमांमध्ये गुणाट गावात या एक लाखाच्या बक्षीसावरून श्रेयवाद सुरू असल्याच्या बातम्या आल्या ग्रामस्थ काय म्हणतातःगावातील आलेल्या बातम्यांवर ग्रामस्थ म्हणाले, गावात कोणताही वाद नाही. मुळात आम्हाला एक लाखाचे बक्षीससुद्धा नको. पण आमच्या गावची बदनामी थांबवा. आम्हाला डीसीपींनी मदतीचे आवाहन केले होते. त्यानुसार मदत करावी, असा निर्णय आम्ही घेतला, असे गुणाट गावाचे सरपंच रामदास काकडे यांनी म्हटले.

गावाचे पोलीस पाटील हनुमंत सोनवणे म्हणाले, आम्ही गुन्हेगारास पकडून दिले आहे. पोलिसांना सहकार्य केले आहे. आमच्या गावात बक्षीसाठी कोणताही वाद नाही. त्यामुळे त्या संदर्भातील चुकीच्या बातम्या देऊ नये.

# महायुतीसाठी धनंजय मुंडेंचा राजीनामा घ्या

नागपूर। प्रतिनिधी संतोष देशमुख हत्या प्रकरणात मंत्री धनंजय मु डे यांचा संबंध नसला तरी यातील आरोपी वाल्मिक कराड त्यांच्या जवळचा आहे. त्यामुळे नीतिमत्तेच्या आधारावर धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यायला पाहिजे, असे मत केंद्रीय राज्यमंत्री तथा रिपाइंचे अध्यक्ष रामदास आठवले यांनी व्यक्त केले. त्यानंतर आता भाजप नेते आणि माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनीही भाष्य केले आहे. राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याचा दबाव सरकारावर येऊ लागला आहे. आजपासून अधिवेशन सुरू होत असल्याने विरोधकही याच मुद्यावर सरकारला घेरणार असल्याचे दिसते. धनंजय मुंडे यांच्या पत्नी करुणा मुंडे यांनी राजीनाम्याचा निर्णय झाला असल्याचा दावा केला आहे. यावर सुधीर मुनगंटीवार यांनी महत्त्वाचे भाष्य केले आहे. मुनगंटीवार म्हणाले, धनंजय मु डे यांचा राजीनामा दोन दिवसात घेणार की नाही हे मला माहीत नाही. यावर निर्णय घेण्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सक्षम आहेत. त्यांच्याकडे गृह खाते आहे. पोलिस विभागाने त्यांना या संदर्भात काही माहिती दिली असेल, याशिवाय कृषी घोटाळ्याच्या आरोपावर कृषी विभागाच्या सचिवांनी त्यांना काही पुरावे दिले असतील तर ते निश्चितच निर्णय घेतील असेही ते म्हणाले. धनंजय मु डे यांच्यावर होणारे आरोप हे खरे असतील, त्यांचा आणि आरोपी वाल्मिक कराडचा संबंध असेल तर त्यांचा राजीनामा मुख्यमंत्र्यांनी घेणे गरजेचे आहे. आरोप खोटे असतील आणि त्यात काही तथ्य नसल्यास मुख्यमंत्र्यांनी याची माहिती सभागृहात द्यावी लागेल, असेही मुनगंटीवार यांनी सांगितले. महायुतीचे सरकार स्थापन झाल्यापासून धनंजय मु डे अडचणीत आले आहेत. याच काळात सरपंच देशमुख यांच्या हत्येचे प्रकरण घडले होते. हिवाळी अधिवेशन सुरू झाल्यनंतर एक रुपयात पीक विमा योजनेतील घोटाळ्याच्या विषय समोर आला होता.

# राज्यातील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी ६,४८६ कोटींच्या निधीची तरतूद

## अर्थमंत्री अजित पवारांची घोषणा

नागपूर। प्रतिनिधी महाराष्ट्रात महायुतीचं नवं सरकार स्थापन झाल्यानंतर पहिलंच अर्थसंकल्पीय अधिवेशन आजपासून (३ मार्च) सुरू झालं आहे. आज विधीमंडळात राज्यपालांचं अभिभाषण पार पडलं. त्यानंतर अधिवेशनाला सुरुवात झाली. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी विधानसभेत महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील घरं, कृषी पंपांना वीजेच्या दरात सवलत व इतर पायाभूत सुविधांच्या विकासासंदर्भात पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या. तसेच राज्यातील विविध प्रकल्पांसाठी निधीची तरतूद जाहीर करण्यात आली. यावेळी अर्थमंत्री अजित पवार म्हणाले, राज्याच्या कानाकोपऱ्यातील पायाभूत सुविधांच्या विकासाला बळकटी देण्यासाठी यंदा एकूण ६,४८६.२० कोटी रुपये निधीची तरतूद करण्यात आली आहे. त्यापैकी निव्वळ भार ४,२४५.९४ कोटी रुपये इतकाच आहे. अजित पवारांनी यासंदर्भात एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की आजपासून सुरू झालेल्या महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२५फच्या पहिल्या दिवशी राज्याच्या ग्रामीण भागातील घरं, कृषीपंपांना वीजदरात सवलत, रस्ते विकासाला गती अशा पायाभूत सुविधा आणि लोकहिताच्या योजनांसाठी वर्ष २०२४-२५ च्या पुरवणी मागण्या विधानसभेत सादर केल्या. या मागण्यांमध्ये ग्रामीण भागातील नागरिकांना पंतप्रधान आवास योजनेतून घरं, मुख्यमंत्री बळीराजा वीजदर सवलत योजनेंतर्गत कृषीपंप ग्राहकांना वीजदर सवलत, केंद्र शासनाच्या योजनांतर्गत रस्ते व पूल प्रकल्पांसाठी बिनव्याजी कर्जासाठी निधी, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य योजना, पुणे रिंग रोड, जालना-नांदेड द्रुतगती महामार्गाच्या कामांना गती, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळासाठी बळीराजा जलसंजीवनी योजना, तसेच शासन अंशदान घटकाखाली विविध प्रकल्पांसाठीचा निधी या सर्वांचा समावेश आहे. अजित पवार म्हणाले, राज्याच्या पायाभूत विकासाला बळकटी देण्यासाठी या अनुषंगानं यंदा एकूण ६,४८६.२० कोटी रुपये निधीची तरतूद करण्यात आली असून, त्यातील निव्वळ भार ४,२४५.९४ कोटी रुपये इतकाच आहे. आज विधानसभेत सादर करण्यात आलेल्या एकूण ६,४८६.२० कोटी रुपयांपैकी ९३२.५४ कोटी रुपये अनिवार्य मागण्या, ३,४२०.४१ कोटी रुपये कार्यक्रमांतर्गत मागण्या, २,१३३.२५ कोटी रुपये केंद्र पुरस्कृत योजनांअंतर्गत अर्थसहाय्य म्हणून प्रस्तावित आहेत. या पुरवणी मागण्यांद्वारे राज्यातील विविध घटकांचा सर्वसमावेशक विकास साधण्याच्या दृष्टीनं हा अर्थसंकल्प निश्चितच महत्त्वपूर्ण ठरेल, असा मला विश्वास आहे.

# बीड जिल्ह्याची बदनामी थांबवा: बीडचं पुणे होऊ देणार नाही : डॉ.गणेश ढवळे

बीड : बीड जिल्हा हा गुणवंतांचा जिल्हा आहे. या जिल्ह्याने कलाक्षेत्रात, शैक्षणिक क्षेत्रात, राजकीय क्षेत्रात, क्षेत्रात सामाजिक क्षेत्रात ,प्रशासकीय पातळीवर तसेच न्यायिक क्षेत्रांमध्ये एवढेच नव्हे तर सर्व क्षेत्रांमध्ये यशस्वी गरुड झेप घेतलेली आहे .स्नेहभाव जपणारा जातीय सलोखा जोपासणाऱ्या या बीड जिल्ह्याला काही लोक बदनाम करत आहेत.बीड जिल्ह्याची बदनामी थांबवा या प्रमुख मागणीकडे लक्ष्य वेधण्यासाठी आणि, कोथरुडचं बीड होऊ देणार नाही पुण्यामध्ये बीडची बदनामी करणा-या लागलेल्या फलकाच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली दि.०३ सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले.यावेळी आंदोलनात शेख युनुस, पांडुरंग हराळे,शेख मुबीन, शेख मुस्ताक, बीड जिल्हाध्यक्ष इंटक रामधन जमाले, बीड जिल्हा सचिव इंटक सखाराम बेंगडे सहभागी होते. जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांना निवेदन देण्यात आले. बीड जिल्हा हा गुणवंतांचा जिल्हा आहे. या जिल्ह्याने कलाक्षेत्रात, शैक्षणिक क्षेत्रात, राजकीय क्षेत्रात, क्रीडा क्षेत्रात सामाजिक क्षेत्रात, प्रशासकीय पातळीवर तसेच न्यायिक क्षेत्रांमध्ये एवढेच नाही सर्वच क्षेत्रांमध्ये यशस्वी गरुड झेप घेतली आहे. स्नेहभाव जपणाऱ्या जातीय सलोखा जोपासणाऱ्या या बीड जिल्ह्याला बाहेरच्या मीडियाने सर्वाधिक बदनाम केले आहे. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याकांड




अमानुष असून मानवतेला काळीमा फासणारे आहे. या प्रकरणातील आरोपींना कठोरात कठोर शिक्षा व्हावी अशी बीडकरांची इच्छा आणि मागणी आहे. मात्र काही इलेक्ट्रॉनिक मीडियांनी बीड जिल्ह्यात येऊन जिल्ह्याच्या अस्मितेचे आणि एकात्मतेचे लचके तोडले आहेत. त्यामुळे बीड जिल्ह्याची प्रतिमा महाराष्ट्रात बिहार पेक्षा वाईट अशी जाणीवपूर्वक रंगवण्यात आली. एका घटनेने संपूर्ण बीड जिल्ह्यात वाईट ठेवण्याचा जो प्रकार सध्या सुरू आहे. तो थांबवणे गरजेचे आहे. बीड जिल्ह्याची बदनामी थांबवण्याची जबाबदारी आम्हा सर्व बीडकरांची आहे. तसेच बिघडलेले वातावरण पुन्हा एकच चांगले करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घेण्याची गरज आहे या सामाजिक जाणिवेतून बीड जिल्ह्याची बदनामी थांबवावी या प्रमुख मागणीकडे लक्ष्य वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.०३ सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले.

# राजर्षी शाहू ता.ग्रामीण नागरी सहकारी पतसंस्थेची निवडणुक बिनविरोध



केज येथील राजर्षी शाहू ता ग्रामीण नागरी सहकारी पतसंस्था म.केज या पत संस्थेची सन २०२५-२०३० या पंचवार्षिक कालावधी करीता चेअरमन , व्हा. चेअरमन, व संचालक मंडळाची निवडणूक बिनविरोध पार पडली. संस्थेचा कारभार योग्य रीतीने सुरु असल्यामुळे अनावश्यक खर्च टाळुन निवडणूक बिनविरोध करण्यात आली या बिनविरोध निवडणुकीसाठी संस्थेचे व्यवस्थापक प्रवीण भिसे लिपिक राजेश साखरे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या संस्थेच्या चेअरमन पदी रमेश शिंदे,तर व्हा. चेअरमन पदी लालासाहेब वायबसे यांची बिनविरोध निवड करण्यात आली या निवडी बद्दल. येडेश्वरी साखर कारखान्याचे चेअरमन तथा खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी सर्व संचालक मंडळाचे अभिनंदन केले आहे . यावेळी श्री. गायकवाड वचिष्ठ रामरतन,श्री.जाधव विजयसिंह रावसाहेब, श्री.थोरात राजपाल प्रकाश, श्री . जाधव श्रीहरी चंद्रसेन,सय्यद शरीफ सय्यद पाशा श्री.पोटभरे माणिक रावण. श्री. संभाजी लोमटे श्री.तारळकर अशोक सदाशिव,श्री. नाळवंडीकर प्रकाश श्री. करपे संदीप अंकुशराव, श्री . गणेश शिंदे साहाय्यक निबंधक कार्यालयाचे जगदाळे साहेब, मुंडे साहेब,पवार साहेब मुख्य कार्यकारी अधिकारी अजित आरेकर व संस्थेचे सभासद उपस्थित होते.

# अफू अन् घोरपड गुप्तांग तस्करीमुळे बीड पुन्हा चर्चेत

बीड जिल्हा नेहमीच काहींना काही कारणाने चर्चेत असतोच, सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण काहीसे मागे पडत असतानाच धारुर तालुक्यात छापा मारुन बीड पोलिसांनी तब्बल ४ कोटी ३२ लाखांचे ५४० कि.७५९ ग्राम अफूचे पीक जप्त केले. सोलापूर येथे घोरपडीच्या गुप्तांगाची तस्करी करताना वन विभागाने तिघे ताब्यात घेतले हे तिन्ही जण बीड जिल्ह्यातील आहेत. या दोन घटनांनी पुन्हा बीड जिल्हा चर्चेत आला. मागील १० वर्षांपूर्वी बीड जिल्ह्यातील अफू लागवड राज्यच नव्हे तर देशात गाजली आहे. याप्रकरणी शेकडो जणांवर गुन्हा दाखल झालेला आहे. त्यानंतर जिल्हाभरात तपासणी मोहीम राबवून साधे उकिरड्यावरही चार झाडे दिसली की, गुन्हे दाखल करण्यात आले. त्यावेळी सर्वांनीच याची दहशत घेत भाजीपाला उत्पादन घेणारे शेतकरी दिवसभर फक्त शेतातच थांबून काही दुसरे कोणतेही रोप दिसले की, उपटून टाकायचे असे चित्र दिसत होते.

# दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूल मध्ये जागतिक विज्ञान दिनाचे औचित्य साधून भव्य विज्ञान प्रदर्शनीचे आयोजन

परळी(प्रतिनीधी): दरवर्षी प्रमाणे या ही वर्षी प्रशालेतील प्राचार्य, विद्यार्थी, पालक,शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांच्या उपस्थितीत विज्ञान दिवस व सी.व्हि. रमण यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आली. सदर कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी प्रशालेचे मुख्याध्यापक श्रीकांत पाटील सर व प्रमुख पाहुणे व परीक्षक म्हणून लाभलेले लक्ष्मीबाई महिला महाविद्यालयाचे प्रा. अशोक पवार सर आणि प्रा.सौ.विना भांगे मॅडम व कु. वेदांचे पाटील यांच्या हस्ते प्रतिमा पूजन तसेच उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी विविध विज्ञान प्रकल्पांचे सादरीकरण यामध्ये प्रत्यक्ष कार्य करणा-या प्रतिकृती , चित्रफिती, चित्र इत्यादी प्रकल्पांचा समावेश होता.या सर्व प्रकल्पातून विद्यार्थ्यांनी आपल्या वैज्ञानिकतेची चुणूक दाखवत उत्तम प्रकारे प्रकल्पांचे स्पष्टीकरण ही केले. या प्रदर्शनीस प्रेक्षक म्हणून प्रमुख पाहुणे तसेच पालकांचे योगदान लाभले.यामध्ये इयत्ता पहिली ते आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. दरवर्षी विज्ञान प्रदर्शनी भरवण्यामागे विद्यार्थ्यांच्या अंगी वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्याचा तसेच विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा या उद्देशाने आयोजन करण्यात येते. याप्रसंगी सर्व शिक्षकवर्ग व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थिती होते.



तसेच प्रशालेचे मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुण्यांनी आपले मनोगत व्यक्त करत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. सदर प्रसंगी विवेकानंद युथ वेलफेअर सोसायटीच्या अध्यक्षा सौ.उषा किरण गित्ते मॅडम यांनी विज्ञान दिनाच्या सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.तसेच प्रशालेचे प्रेरणास्थान व मार्गदर्शक मा. श्री. किरण गित्ते साहेब (सचिव,नगरविकास, सार्वजनिक बांधकाम, उद्योग आरोग्य,पर्यटन विभाग त्रिपुरा सरकार) प्रशालेचे मुख्याध्यापक श्री.श्रीकांत पाटील यांनी सर्व विद्यार्थी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांना विज्ञान दिनानिमित्तनिमित्त हार्दिक शुभेच्छा दिल्या आणि विद्यार्थ्यांना वैज्ञानिक संशोधनात प्रगती करण्यासाठी प्रोत्साहित केले. विज्ञान दिनाची सांगता विद्यार्थी संशोधकांनी अत्यंत उत्साहात व आनंदात केली.

# आजी माजी लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळे मराठवाड्यावर कायम अन्याय झाला

## मराठवाड्याततील सर्व आमदारांची मुंबईला बैठक-संजय लाखे



**“ मराठवाड्यातील लोक प्रतिनिधींनी एकत्र यावे-संजय लाखे पाटील**

मराठवाड्यातील आठ जिल्हायातील सर्व पक्षीय आजी माजी लोक प्रतिनिधींनी एकत्र येऊन याबाबत सरकार सोबत आवाज उठवावा.यासाठी शनिवार रोजी सर्व मराठवाड्यातील आमदारांनी राज्य सरकारला धारेवर धरत मराठवाड्या हक्काच्या पाण्यासाठी मुंबई येथिल बैठकीला उपस्थित राहावे.

**“ गेवराईतून अंदोलण्याच्या लढ्यात आम्ही सहभागी-संजय काळे**

मरराठवाड्याला हक्काचे पाणी पैठणच्या जायकवाडी धरणातून मिळणे आवश्यक आहे.यासाठी गेवराई तालुक्यातील शेतक-यांना सोबत घेऊन जण अंदोलने कक्षणार.शेवटी दिल्लीच्या न्यायालयात आम्ही धाव या मागणीसिठी घेणिर.

गेवराई । प्रतिनिधी पैठणच्या जायकवाडी धरणात शासन नियमानुसार टंचाईच्या काळात ६५ टक्के पाणीसाठा राहणे बंधनकारक आसताना मांदाडे समितीने अहवाल दिल्यानंतर हा साठा ५८ टक्के ठेवण्याचा निर्णय राज्य सरकारने फेब्रवारी २०२५ ला घेतला आहे.यामुळे मराठवाड्यावर आजवर कायम अन्याय होत आला आहे.त्यातच मराठवाड्यातील सर्व पक्षांच्या आजी माजी लोकप्रतिनिधी दुर्लक्ष करत आसल्याने राज्य सरकार जाणिवपुर्वक मराठवाड्याला कायम टंचाईच्या संकटात नेत आहे.मराठवाड्याला कायम हक्काचे पाणी मिळावे यासाठी शासन स्तरावर आता लढा उभारल्या शिवाय पर्याय नाही,या मागणी संदर्भात मराठवाड्यातील सर्व लोक प्रतिनिधींना पत्र व्यवहार केला असुन शनिवारी सर्व आमदारांच्या बैठकीचे मु ंबई येथे आयोजन करण्यात आले आहे.दरम्यान याबाबत राज्य सरकारने परिपत्रक काढून येत्या १५ मार्च पर्यंत मराठवाड्यातील सर्व नागरिकांना हरकती नोंदवण्याचे सांगण्यात आले आहे.दरम्यान आता मराठवाड्याला हक्काचे पाणी मिळण्यासाठी सर्वत्र व्यापक जनजागृती करुन,वेळ प्रसंगी व्यापक अंदोलने छेडण्याची तयारी देखील करण्याची वेळ आल्याचे अनुशेष निर्मुलन समितीचे अध्यक्ष दिली. गेवराई येथील संजय काळे यांच्या परिवर्तन कार्यालयात रविवारी रोजी आयोजीत करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.यावेळी संजय काळेसह विविध जण उपस्थित होते.पुढे बोलताना ते म्हणाले की,२०१२ या काळात मांदाडे समितीने टंचाईच्या काळात ६५ टक्क्यावरुन ५८ टक्के पाणी साठा पैठणच्या धरणात असला तरि देखील,वरच्या धरणातून मराठवाड्याला पाणी सोडण्याची आवशक्यता नसल्याचा अहवाल या समितीने राज्य सरकाला त्यावेळी दिला.आजही या अहवालानुसार हि प्रक्रिया होत असल्याने मराठवाड्यात संताप व्यक्त होऊन,राज्य सरकार मांदाडे समितीच्या अहवालानुसार कायम अन्याय करत आहे.मराठवाडा आपल्या हक्काच्या पाण्या वाचून वंचित राहत आसताना मराठवाड्यातील सर्वच पक्षांचे आजी माजी व गाव पातळीपासून ते जिल्हा पातळीवरिल सर्व लोक प्रतिनिधी आजवर आवाज न उठविता दुर्लक्ष करत आल्याने मराठवाड्यावर आजवर कायम अन्याय होत आला आहे. मराठवाड्याला कायम हक्काचे पाणी पैठणच्या जायकवाडी धरणातून मिळावे यासाठी आम्ही लढा देत असुन याबाबबत यापुर्वीच दिल्ली उच्च न्यायालयात याचिका मी दाखल केलेली आहे.आता शासनाने ५८ टक्के पाणी पुरेशा आहे,याबाबत परिपत्रक काढले असुन १५ मार्च पर्यंत हरकती नोंदवण्याचे अवाहन सरकारने केले आहे.दरम्यान मराठवाड्याला हक्काचे संकटकाळी पाणी मिळावे,यासाठी आमचा लढा असुन यासाठी संपूर्ण मराठवाड्यात व्यापक जनजागृती व पुढील अंदोलानांची दिशा ठरवण्याचे आम्ही कार्य हाती घेतल्याचे संजय पाटिल यांनी यावेळी सांगितले.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com